# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 30/01/2020 (गुरूवार)
# (सकाळ)

---

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर भंडारबोडी रामटेक येथे दिनांक 27/01/2020 चे 06:00 वा. ते 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– तुकाराम मारोती केळवदे, वय 27 वर्ष, रा. महात्मा फुले वार्ड, रामटेक हे त्यांच्या एमएच–40/एपी–8894 क्रमांकाच्या मोटरसायकलने मंडई पाहण्याकरिता भंडारबोडी येथे गेले होते. फिर्यादीने त्यांची मोटरसायकल ग्राम पंचायतच्या मागे ठेवली असतांना अज्ञात आरोपीने सदर गाडी लॉक तोडून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नोरीया हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. मौदा :– दिनांक 29/01/2020 चे 12.05 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) केशव नत्थुजी पडोळे, 2) ललीता केशव पडोळे व 3) जितेन्द्र केशव पडोळे हे 48 वर्षीय पीडिता/फिर्यादी यांच्या घरात लाकडी खोड फेकत होते. दरम्यान फिर्यादीने आरोपीस म्हटले की, ''हा खोड माझ्या घरात फेकायचे नाही.'' यावरून आरोपीतांनी पीडितेस शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच आरोपीतांनी पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ), 323, 504, 506, 34 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार ठाकुर 7083151993 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– दिनांक 29/01/2020 चे 19.30 वा. दरम्यान 36 वर्षीय पीडित/फिर्यादी या एमएच–40/ बीटी– 7399 क्रमांकाच्या जुपीटर मोपेडने घरी जात असतांना एक अनोळखी आरोपी वय अंदाजे 30 ते 35 वर्ष असलेला तोडाला पांढऱ्या रंगाचा बांधलेला त्याच्या मोटरसायकलने फिर्यादीचे गाडीचे अचानक समोर येवुन त्याची गाडी फिर्यादीच्या गाडीचे समोर आडवी करुन थांबवली. गाडी थांबवुन खाली उतरली असता आरोपी हा तिच्याकडे आला तेंव्हा फिर्यादी ही गाडी सोडून धावत असता आरोपीने तिचा पाठलाग करून

फिर्यादीला शिवीगाळ करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व जिवाने मारण्याची धमकी दिली. तपासामध्ये आरोपी नामे– रतन महंत बिहारी, वय 33 वर्ष, रा. अमठा, पो. स्टे. धर्मगढ, त. दसपुर, जि. कलहंडी(उडीसा)ह. मु. हनुमान नगर मौदा, जि. नागपूर हा निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (ड), 341, 504, 323 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर